**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

(वन क्षेत्रातून / जंगलातून खाजगी जमिनीवर जाण्यासाठी पोहोच रस्त्यासंदर्भात राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना निदेश)

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२३/अनौसं-२६/२२/प्र.क्र.१५/२०२३/नवि-१३,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

चौथा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक : ०९.०१.२०२४**

## आदेश

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६***

**प्रस्तावना -**

**I)** खाजगी मालकीच्या क्षेत्रात जाण्यासाठी वनक्षेत्रातून / जंगलातून रस्ता तयार करण्यासाठी खाजगी व्यक्तींकडून वनक्षेत्राची मागणी केली जाते. त्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत वनजमीन वळतीकरणाचे प्रस्ताव सादर करण्यात येतात. अनेकदा शेतजमिनीवर पोहोचणे, घर, गृहप्रकल्प, कारखाने, Logistics Park, Integrated Logistics Park, Warehouse Projects, Eco-Tourism Activity, Resorts इ. प्रयोजने प्रस्तावित असतात. अशा प्रकल्पांना नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगी मिळण्यासाठी MRTP Act / UDCPR मधील तरतूदीनसार पोहोच रस्त्यांची रुंदी किमान १५ मी./ १२ मी. /९ मी. / ६ मी. / ४.५ मी. असण्याची आवश्यकता असल्यामुळे खाजगी यंत्रणांकडून १५ मी. / १२ मी. / ९मी. रुंदीच्या व सुमारे २००/३००/ ५०० / १०००मी. लांबीचे पोहोच रस्त्यासाठी खाजगी व्यक्ती / यंत्रणेकडून वनजमिनीची मागणी करण्यात येते.

**II)** वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाने केलेले नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार एखाद्या प्रकल्प स्थळ विवक्षित (site specific) असेल आणि त्यासाठी कमीत कमी वनजमिनीची अपरिहार्यपणे आवश्यकता असणे गरजेचे असते. विशेषत: कोकण विभागातील वनजमिनी डोंगर उतारावरील आहेत. अशा ठिकाणी देखील खाजगी यंत्रणांकडून ९ मी. / १२ मी. रूंदीच्या पोहोच रस्त्याच्या मागणी केली जाते. त्यामुळे वनक्षेत्राचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. केवळ काही व्यक्तींसाठी वनक्षेत्रातून एवढ्या मोठ्या रूंदीचा रस्ता मंजूर करणे अपेक्षित नाही. अनेकदा ज्या मुख्य रस्त्यापासून पोहोच रस्ता करणे प्रस्तावित आहे असा मुख्य रस्ता देखील तेवढ्या रूंदीचा नसतो. तसेच ज्या खाजगी जमिनीवर जाण्यासाठी पोहोच रस्त्याची मागणी केली जाते त्या जमिनीच्या क्षेत्रफळाच्या तुलनेत पोहोच रस्त्यासाठी जास्त वनक्षेत्र लागते. जास्त FSI अनुज्ञेय होण्यासाठी खाजगी

व्यक्तींकडून मोठ्या रस्त्याची मागणी होते. काही व्यक्तींकडून अगदी १ कि.मी. लांबीपर्यंतच्या पोहोच रस्त्यासाठी वनजमिनीची मागणी करण्यात येते. अशा प्रकरणी वन संवर्धनाच्या दृष्टीने वन क्षेत्रामधून जाणाऱ्या पोहच रस्त्यासंदर्भात राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना आवश्यक ते सूचना / निदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्यास अनुसरुन उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये प्राप्त अधिकारात शासन राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना खालीलप्रमाणे निदेश देत आहे.

**शासन निदेश**

१. वनक्षेत्रातून खाजगी मालकीच्या जमिनीवर जाण्यासाठी (उदा.शेतजमिनीवर पोहोचणे, घर, गृहप्रकल्प, रिसॉर्ट, Eco-Tourism Activity इ. रहिवास व वाणिज्य प्रयोजनाकरिता जाण्यासाठी) वनक्षेत्रातून / जंगलातून जास्तीत जास्त १५० मी. लांबी व ४.५ मी. रूंदीपर्यंतचा पोहोच रस्ता म्हणून गृहीत धरण्यात यावा. तथापि, अशा प्रकल्पांना रेखांकन / विकास / बांधकाम परवानगी देण्यापूर्वी शासनाच्या वन विभागाची पूर्व मंजूरी घेणे बंधनकारक राहील अशा प्रस्तांवांमध्ये. Compensatory Levies (भरपाई शुल्क) वनविभागाने वसूल करावी.

२. अशा स्वरुपाच्या प्रकल्पांकडे / खाजगी मालकीच्या जमिनींकडे वनक्षेत्रातून / जंगलातून जाणारा पोहोच रस्ता ज्या मुख्य रस्त्याला अथवा वर्गीकृत रस्त्यास मिळतो त्या मुख्य रस्त्याची किंवा वर्गीकृत रस्त्याची रूंदी जोडावर (Near Junction) ४.५ मी. पेक्षा कमी असल्यास, त्या मुख्य रस्त्याच्या अथवा वर्गीकृत रस्त्याच्या रूंदीच्या मर्यादेतच वनक्षेत्रातून पोहोच रस्ता शासनाच्या वन विभागाच्या पूर्व परवानगीने मंजूर करण्यात येईल. त्यासाठी प्रकरणपरत्वे मंजूर अथवा नामंजूर करण्यास वन विभाग सक्षम असेल

३. अपरिहार्य परिस्थितीत वन क्षेत्रातून जाणा-या रस्त्याबाबत १५० मी. ते ५०० मी. आणि ५०० मी. पेक्षा जास्त लांबी पर्यंतच्या आणि ४.५ मी. पेक्षा जास्त रूंदीच्या पोहोच रस्त्यांबाबतचे प्रस्ताव सार्वजनिक हित, प्रकल्पाची निकड, स्थळ विवक्षितता इ. बाबी विचारात घेऊन प्रकरणपरत्वे मंजूर अथवा नामंजूर करण्यास शासनाचा वन विभाग सक्षम असेल.

४. पोहोच रस्त्याचे संदर्भात वन विभागाचा निर्णय विचारात घेऊन नियोजन प्राधिकरण यांनी पुढील उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५. सदर निर्णय राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना लागू राहील.

६. सदरचे निदेश हे तात्काळ अंमलात येतील.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.*

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

**(प्रणव कर्पे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत : - आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. जिल्हाधिकारी - सर्व जिल्हे.

२. आयुक्त, सर्व महानगरपालिका

३. मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा / सर्व नगरपंचायती.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हापरिषदा.

५. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

६. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

**प्रत -**

१. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा.उप मुख्यमंत्री महोदय यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

४. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

८. प्रधान सचिव, वने मंत्रालय, मुंबई.

९. प्रधान सचिव, (नवि-२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१०. संचालक (नगर रचना) तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीसाठी -**

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२) विभागीय सहसंचालक, नगर रचना, पुणे / नागपूर / अमरावती / कोकण / औरंगाबाद / नाशिक.

३) विभागीय आयुक्त, पुणे / नागपूर / अमरावती / कोकण / औरंगाबाद / नाशिक.

४) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग, सर्व शाखा कार्यालये.

५) अवर सचिव, नवि -११ / नवि-३०, कक्ष अधिकारी, नवि-९ / नवि -१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
-/सदर आदेश विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावेत.

७) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.
-/सदर आदेश शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

८) निवड नस्ती, कार्यासन (नवि-१३).

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते